सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/ 1471
दिनांक 23 MAY 2025

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व बी.बी.ए., बी.बी.एम.,बी.एम.एस.,बी.सी.ए.,एम.बी.ए., इंटिग्रेटेड इत्यादी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम.,बी.एम.एस.,बी.सी.ए.,एम.बी.ए., इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत..**

**संदर्भ** : १. संचालक,तंत्र शिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२४-२५/१४७ दिनांक १०/०३/२०२५
२.या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/६९४ दिनांक ११ मार्च २०२५
३. संचालक,तंत्र शिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/२९१ दिनांक २२ मे २०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संचालनालयाच्या दि.१०.०३.२०२५ च्या संदर्भिय क्र.१ च्या पत्रान्वये वरील विषयाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय क्र २ नुसार कळविण्यात आलेले होते. परंतु, उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने याबाबत कळविण्यात येते की, संचालनालयाचे संदर्भिय क्र.३ च्या पत्रानुसार सुचित केल्यानुसार दि.१०.०३.२०२५ रोजीचे संदर्भ क्र.१ चे संचालनालयाचे पत्र रद्द करण्यात येत असल्याचे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.३ च्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

तरी सदर पत्राचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:१. मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सादर.
**२. प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६
ई-मेल-desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे**

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/२९१
दिनांक:- २२/ ०५/२०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

विषय:- **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत...**

संदर्भ १) संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४-२५/१४७ दि.१०/०३/२०२५
२) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.२०/०५/२०२५
३) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४, दि.२०/०५/२०२५

संचालनालयाच्या दि.१०/०३/२०२५ च्या संदर्भीय क्र.१ च्या पत्रान्वये वरील विषयाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु, उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने याबाबत कळविण्यात येते की, दि.२०/०५/२०२५ रोजीच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सूचित केल्यानुसार, दि.१०/०३/२०२५ रोजीचे संदर्भ क्र.१ चे संचालनालयाचे पत्र रद्द करण्यात येत आहे.

तसेच, दि.२०/०५/२०२५ रोजीच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भ क्र.३ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी. ए, एम.बी.ए इंटिग्रेटेड इ. हे अभ्यासक्रम प्रथमच शै.वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शै. वर्ष - २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. या बाबी विचारात घेता, **शै. वर्ष - २०२४-२५ साठीचे** सदर अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने पुढील १५ दिवसांत निश्चित करायचे आहे आणि त्यांनी त्याबाबतची माहिती सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करुन द्यायची आहे. आपल्या माहितीसाठी संदर्भ क्र.३ च्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी सदर अभ्यासक्रमांचे शुल्काबाबतची संबंधित विद्यापीठाकडून माहिती उपलब्ध झाल्यानंतर डीबीटी पोर्टलवर **शै. वर्ष - २०२४-२५ साठीची** शुल्क मंजूरीबाबतची कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत : १.मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.
२.मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी.
३.मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी.
४.सर्व प्राचार्य, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड संस्था यांना माहीती व आवश्यक कार्यवाहिकरिता:

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२२०४०९३५ Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र.४१/तांशि-४ दिनांक : २० मे, २०२५.

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व संबंधित अकृषि विद्यापीठे.

२) कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड.

३) सर्व सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये AICTE च्या अखत्यारित आलेल्या बी.बी.ए., बी.सी.ए. व अन्य अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत....

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. हे अभ्यासक्रम प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. या बाबी विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून AICTE अंतर्गत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड इ. या अभ्यासक्रमांचे शुल्क संबंधित विद्यापीठाने पुढील १५ दिवसात निश्चित करुन, त्याबाबतची माहिती संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार संबंधित सहसंचालक यांनी उपरोक्त अभ्यासक्रमांच्या शिष्यवृत्तीबाबतची आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी व त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

(संतोष खोरगडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४) निवडनस्ती (तांशि-४)